MHGO050000342026

<u>किरकोळ फौजदारी अर्ज क्र. ०५/२०२६</u>
<u>आशिष धनराज कठाणे मार्फत समीर किशोर गेडाम विरूध्द सरकार</u>

## निशाणी ०१ वरील आदेश

प्रस्तुत अर्ज हा बोलेरो पिकअप वाहन क्रमांक MH–15 G.V–1891, इंजिन क्रमांक TBK1C38962, चेसीस क्रमांक MA1ZN2TBKK1C29680 हे वाहन सुपूर्दनाम्यावर भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम ५०३ अन्वये परत मिळण्याकरिता दाखल केलेला आहे.

२. <u>अर्जदारचे कथन थोडक्यात असे आहे की,</u>

सदर वाहन हे प्राण्यांचे क्रूरतेपासून संरक्षण अधिनियम, १९६० च्या कलम ११(१)(ड) अन्वये गुन्हा क्रमांक ६२३/२०२५ मध्ये जप्त करण्यात आलेले आहे. सदर वाहनामधून जनावरांची वाहतूक करताना त्यांना अत्यंत अरुंद जागेत, आवश्यक अन्न–पाणी व विश्रांती न देता, तसेच क्रूरतेने बांधून नेण्यात येत होते असा दोषारोप ठेऊन संबंधित कायद्यांतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे. अर्जदाराने असे कथन केलेले आहे की, सदर वाहन अर्जदार समीर गेडांम याचे मालकीचे नसून त्याने ते आशिष धनराज कठाणे याचेकडून भाडे तत्वावर घेतलेले आहे व त्यासंदर्भातील नोटरीकृत करारनामा दाखल केला आहे. तसेच वाहन पोलिस ठाण्यात दीर्घकाळ निष्क्रिय अवस्थेत राहिल्यास त्याचे नुकसान होऊन त्यास आर्थिक तोटा सहन करावा लागेल. प्रस्तुत गुन्ह्याचा तपास पूर्ण झालेला असून वाहनाची आता आवश्यकता राहिलेली नाही. अर्जदार सर्व अटी व शर्तीचे पालन करण्यास तयार आहे. त्यामुळे वाहन सुपूर्दनाम्यावर परत देण्यात यावे.

३. सरकारी वकील व तपासी अधिकारी यांनी हरकत घेतली असून, सदर वाहनाचा वापर पुन्हा सारख्याच गुन्ह्यासाठी वापरेल. तसेच वाहन परस्पर विक्री करण्याची व विल्हेवाट लावण्याची शक्यता नाकारता येत नाही. अर्जदार गरज भासल्यास पुन्हा वाहन हजर करणार

नाही. त्यामुळे अर्ज नामंजूर करण्यात यावा, असे नमूद केले आहे.

४. अन्नपूर्णा गोशाळेने हरकत अर्ज दाखल करून असे नमूद केले आहे की, प्रस्तुत वाहन हे जनावराना चारा–पाण्याची कोणतीही सोय न करता, क्रूरतेने वाहतूक करताना मिळून आलेले आहे. जर वाहन पुन्हा अर्जदार याला परत केले तर तो पुन्हा सारखाच गुन्हा करण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच पुढे असे कथन केलेले आहे की, जर वाहन परत करणार असेल तर त्या वाहनात जप्त करण्यात आलेल्या जनावरांची देखभाल, चारा–पाणी, औषधोपचार यासाठी गोशाळेला खर्च होत असून, अर्जदाराकडून प्रति जनावर प्रतिदीन रक्कम रुपये ४००/– खर्च अर्जदारने प्रकरणाचा अंतिम न्यायनिर्णय होईपावेतो द्यावा अशी विनंती केलेली आहे.

५. दोन्ही विधीज्ञानचा सविस्तर युक्तिवाद ऐकला.

६. अर्ज व म्हणने वाचुन खालील मुद्दे निदर्शणास आलेले असुन त्याचा निष्कर्ष खालीलप्रमाणे:–

| **अनु. क्र.** | **मुद्दा** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | अर्जदार मागितल्याप्रमाणे वाहन मिळण्यास पात्र आहे का ? | होय |
| २ | अन्नपुर्णा गोशाळा मागितल्याप्रमाणे प्रति जनावर प्रति दिवस जप्त जनावरांचा खर्च मिळण्यास पात्र आहे का ? | होय |
| ३ | काय आदेश ? | अर्ज मंजुर करण्यात आला. |

**कारणमिमांसा**

**मुद्दा क्र. १ व २ करिता**

७. मुद्दे क्र. १ व २ एकमेकांशी संलग्न असल्यामुळे त्यांची कारणमिमांसा एकत्रित करण्यात येत आहे.

८.  जप्त वाहन दीर्घकाळ पोलिस ठाण्यात ठेवणे हे न्याय्य नसून त्यामुळे वाहनाची झीज व नासाडी होण्याची शक्यता असते. सरकारी पक्षाची हरकत ही संभाव्यतेवर आधारित असून, ती योग्य अटी लावून टाळता येऊ शकते. त्यामुळे केवळ त्या कारणावरून अर्ज फेटाळणे उचित ठरत नाही. गोशाळेला खर्च देण्याबाबत, प्राण्यांचे क्रूरतेपासून संरक्षण अधिनियम, १९६० अंतर्गत प्राण्यांवरील क्रूरतेच्या प्रकरणांत जप्त केलेल्या जनावरांच्या देखभालीची जबाबदारी तात्पुरती गोशाळा/संस्था यांच्यावर येते. तसेच या कायद्यांतर्गत तयार करण्यात आलेल्या Prevention of Cruelty to Animals (Care and Maintenance of Case Property Animals) Rules, 2017 नुसार, जप्त करण्यात आलेल्या जनावरांच्या संगोपनासाठी होणारा खर्च संबंधित आरोपी/जबाबदार व्यक्तीकडून वसूल करण्याची तरतूद आहे. त्या अनुषंगाने न्यायालयास गोशाळेस प्रत्यक्ष खर्च देण्याबाबत आदेश देण्याचा अधिकार आहे. त्या अनुषंगाने, प्रति जनावर प्रति दिन खर्च देण्याची मागणी ही कायदेशीर व न्याय्य असल्याचे योग्य व संयुक्तिक वाटते. त्यामुळे अर्जदाराला प्रस्तुत वाहन हे जनावरांचा प्रती दिन खर्च देण्याच्या व इतर अटींवर परत करणे योग्य व वाजवी होईल. त्यामुळे मुद्दा क्र. १ व २ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदवुन मुद्दा क्र. ३ करिता खालील आदेश पारित करण्यात येतो –

## आदेश

१.  अर्जदाराचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२.  तपासी अधिकारी यांना निर्देशित करण्यात येते की, गुन्हा क्रमांक ६२३/२०२५ यातील बोलेरो पिकअप वाहन क्रमांक MH-15 G.V-1891, इंजिन क्रमांक TBK1C38962, चेसीस क्रमांक MA1ZN2TBKK1C29680 हे वाहन अर्जदारास सुपूर्दनामा रक्कम रु.२,००,०००/- (रुपये दोन लाख मात्र) इतक्या रकमेचा सुपूर्तनाम्यावर **आशिष धनराज कठाणे** याला खालील अटी व शर्तींवर परत देण्यात यावे —

१)  अर्जदाराने लेखी हमी द्यावी की तो वाहनाची विक्री, हस्तांतरण किंवा त्यामध्ये कोणताही बदल न्यायालायचे पूर्व परवानगीशिवाय करणार नाही. तसेच आवश्यकतेनुसार वाहन न्यायालयास किंवा तपासी अधिकाऱ्यास सादर करणे बंधनकारक राहील.

अर्जदाराने वाहनाचा वापर कोणत्याही बेकायदेशीर किंवा प्राण्यांवरील क्रूरतेच्या कृत्यासाठी करणार नाही.

२) अर्जदार यास निर्देशित करण्यात येते की, अर्जदाराने जनावरे जप्त केल्याचा दिनांकापासुन (म्हणजेच दिनांक ३१.१२.२०२५ पासुन ते आजपर्यंत ०१.०४.२०२६ पर्यंत एकुण ९१ दिवस) जनावरांच्या देखभालीसाठीचा खर्च म्हणुन दररोज प्रति जनावर २००/– मात्र या दराने ०५ जनावरांचा प्रति दिवस रक्कम रू. १०००/– प्रमाणे मात्र (अशी एकुण जनावरे ०५ त्यांची एकुण आजपर्यंतची रक्कम रू.९१,०००/–) मात्र होते. सदरची रक्कम न्यायालयात जमा करावे. Prevention of Cruelty to Animals (Care and Maintenance of Case Property Animals) Rules, 2017 अन्वये **प्रति जनावर प्रति दिन रु. २००/– प्रमाणे खर्च** अदा करणे बंधनकारक राहील.

३) अर्जदाराने न्यायालयात रक्कम रू. २,००,०००/– चे बंधपत्र सादर करावा आणि त्यासोबत रक्कम रू. ५०,०००/– रकमेची आर्थिकदृष्टया सक्षम असलेला जामीन द्यावा.

४) अर्जदाराने याप्रकरणात अंतिम निकाल लागेपर्यंत जनावरांचे देखभाली पोटी भविष्यात/पुढील दिवसांची दर १५ दिवसांच्या अंतराने रक्कम रू. १०००/– मात्र प्रमाणे न्यायालयात जमा करावे. जर अर्जदार वरील रक्कम प्रत्येक निर्धारीत अंतराने कसुर केल्यास गोशाळेला ती रक्कम वसुल करण्याचा अधिकार राहील. अर्जदाराने प्रकरणातील जनावरांचे संगोपन आणि देखभाल नियम २०१७ च्या नियम ५ अन्वये भविष्यातील देयकासाठी रक्कम रू. ५०,०००/– चे बंधपत्र आणि त्यासोबत तितक्याच रकमेची आर्थिकदृष्टया समक्ष जामिनकी सादर करावी. सदरचे रक्कम अर्जदाराने जमा केल्यानंतरच सदरचे वाहन अर्जदाराला परत करावे.

५) अर्जदाराने वाहनाचा मुळ स्वरूपात, रंगात प्रकरणाचा अंतिम निकाललागेपर्यंत कोणताही बदल करू नये.

६) अर्जदाराने वाहन न्यायालय सांगेल त्यावेळी न्यायालयात हजर करावे.

७) प्रकरण चालविण्याकरिता आरोपींना न्यायालयासमोर प्रत्येक तारखेत हजर करावे.

८) तपासी अधिकारी यांना निर्देशीत करण्यात येते की, सदरचे वाहन अर्जदारचे ताब्यात देतेवेळी वाहनाचा चारही बाजुने फोटो काढावा त्याचा पंचनामा करावा, छायाचित्राचा खर्च अर्जदाराने सोसावा व पंचनामा व सदरचे फोटो हे दोषारोपपत्रासोबत न्यायालयात दाखल करावे.

९) सदरचा सुप्रुतनामा सदर दोषारोपत्रासोबत जोडावा.

१०) वरील अटींचे उल्लंघन झाल्यास संबंधित अधिकाऱ्यास वाहन पुन्हा जप्त करण्याचा अधिकार राहील.

३. पोलीस स्टेशन डुग्गीपार यांना वरील प्रमाणे पत्र पाठविण्यात यावे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by PRIYANKA MACHINDRA KAJALE
Date: 2026.04.01 18:03:25 +0530

**दिनांकः ०१/०४/२०२६** **(पी. एम. काजळे)**

**न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, सडक अर्जुनी.**